स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेअंर्तगत मराठी विषयात

पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा गोषवारा (Synopsis)

‘‘ नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांचे लोकवाङ्मय : एक चिकित्सक अभ्यास ’’

मार्गदर्शक

प्रा. डॉ.संतोष चंपती हंकारे

मराठी विभाग प्रमुख

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव.

ता. गंगाखेड जि.परभणी.

-: संशोधक :-

श्री. कांबळे पंडित महादू

मराठी विभाग प्रमुख,

भारती कला व विज्ञान महाविद्यालय, हदगांव.

ता. हदगाव जि. नांदेड

संशोधन केंद

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड.

एप्रिल- २०१९

“ नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांचे लोकवाङ्मय :एक चिकित्सक अभ्यास ”

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती-जमातीचे एकुण जीवणमान पाहता, आपल्या असे लक्षात येते की, या सर्वच जाती-जमाती गावशिवाराबाहेर भटकंती करत जीवन जगत आल्या आहेत. नागरी जीवनापासून, सामाजीक हक्कापासून, घटनात्मक सोयी-सवलतीपासून त्या कोसो दूर आहेत. उपेक्षितांचेच जीवन आजतागायत त्यांच्या वाटयाला आले आहे. . विषमतेच्या ज्वालामुखीत त्यांचे संसार भस्मसात झाले आणि त्यांच्या वाटयाला शतकानुशतके केवळ उपेक्षाच आली आहे. वेशीच्या आत किंवा बाहेर त्यांना स्थान मिळाले नाही. आजतागायत उपरेपणाचे दुर्लक्षित व अस्थिर अशा स्वरूपाचे जीवन त्यांच्या नशिबी आले आहे. तसा सर्वसाधाराणपणे भटका समाज बांधव हा नाच, तमाशा, शिकार, दारू, जुगार, अंधश्रध्दा,पुजाअर्चा, देंवदेवताचे नवस, यासारख्या बाबीवर वेळ व पैसा वाया घालवितो, पण शिक्षण व सामाजीक उन्नती विषयाचे पुस्तके घेण्यासाठी पैसे खर्चीत नाहीत. भटक्या जमातीतील काही बांधवांना सामाजीक सुधारणेची कळवळ व जाणीव असलेली दिसून येते परंतु अशा सुशिक्षित बांधवांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करून प्रेरणा व उत्साह जागृत करणे महत्वाचे आहे. भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या श्रमावर, अंगमेहनीतीवर या देशातील अनेक गावे ना गावे उभारली आहेत. बेलदार जातीच्या चूनामातीच्या कलाकौशल्यातून गावाला गावपण मिळाले. वडार जमातीच्या छन्नी हातोडीने दगडाचे चाक तयार करून समाज जिवनाला गती प्राप्त झाली. जमिनीच्या पोटातून दगड काढून आपल्या देशात अनेक किल्ले, चिरेबंद,राजवाडे, व ताजमाहाल सारखे पवित्र स्थळ अजिंठा,वेरूळ (एलोरा), येथील जगप्रसिध्द लेण्या, विविध शिल्पकला, चित्रकला यासारख्या कलाकौशल्याची जगाला ओळख झाली. परंतु भटक्या विमुक्त जाती- जमाती मात्र उपेक्षितच राहिल्या. घिसाडी, लोहरांनी लोखंडाबरोबर आपले रक्त तापवून या देशातील कृषी व्यवसायाला यंत्रसामुग्री पुरविली. लाखंडाला आकार देऊन विविध प्रकारची शस्त्र घडविली. शिक्कलगारांनी तलवारी,भाले, बर्शी, पायल्या, आदल्या, कलहया, आदि शस्त्र पुरवून रणांगणावरील योध्दयाचे मनोबल वाढवून देशाचे संरक्षणार्थ हातभार लावला आहे. परंतु त्यांच्या या देशसेवेचे आणि निष्ठापूर्वक कार्याचे कोणीही कौतूक केले नाही. एवढेच नाही तर गोंधळी जमातीने शिवकालापुर्वीपासून देशासाठी हेरगिरी केली. गोंधळांच्या माध्यमातून लोकमनोंरंजन व प्रबोधन केले. वैदुंनी जंगलातील जडीबुट्टी शोधून मानवाला आपल्या कलेच्या माध्यमातून रोगमुक्त केंले. गोपाळांनी समाजाला गाई, दुभते पुरविले. तसेच दरवेशी माकडवाल्यांनी जनावरांना शिकवून लोंकरंजन केले. रामोशी जमाती या गावरक्षक म्हणून राबल्या. नंदीवाल्यांनी नंदीबैलांना शिकवून लोकमनोरंजन व अध्यात्मीक कार्य केले बहुरूप्यांनी विविध प्रकारची सोंगे घेवून व आपल्या विनोदीमय बोलीतून लोकमनोरंजन व हास्यरंजन केले. कोळी- समाज बांधवांनी आपल्या मच्छीमारी व्यवसायातून लोकांना खद्यान्न पुरविले. पारधी- बांधवाांनी आपल्या शिकारी या व्यवसायातून जगभर कातडी व्यवसाय करण्यास पुष्टी मिळवून दिली. मसनजोग्यांनी मृत्यु पावलेल्या मानवी प्रेताची दखल घेऊन त्यांची सजावट केली. प्रेतावरची नवीन वस्त्रे आपल्या अंगामध्ये परीधान करून प्रेतासाठी नवीन वस्त्रे परीधान करण्याची पध्दत रूढ केली. अशा विविध भटक्या विमुक्त जाती जमातींनी समाज व देशासाठी वाटा उचलला आहे.भटक्या विमुक्त बांधवांनी असे विविधांगी कार्य देशासाठी व समाजासाठी केले असले तरी या जमातींना समाजात उपेक्षेचे जीवन जगावे लागले.

एखादया देशातील फारमोठा कलासंपन्न व हितरक्षक आणि बलसाधक वर्ग जेव्हा गुन्हेगार ठरविला जातो. तेव्हा आपल्या देशाचा इतिहास सदोष आहे. असे म्हणावे लागेल. गुन्हेगारी आली की त्यामगुन शिक्षाही येत असते.मग ती मनुची (मनुस्मृती) असो की संविधानातील असो की, ब्रिटीशांच्या राजवटीतील असो तिची पातळी एकच असते.आज भटका विमुक्त समाज हा काही प्रमाणात का होईना स्थीर झालेला दिसतो. ज्या गावात तो स्थीरावलेला आहे .त्या गावांना तो स्वत:च गाव माणून त्या गावाच्या लोकांशी नितीमत्तेने वागतो. गावाच्या लोकांशी नितीमत्तेने

राहिल्यामुळे त्यांना गावातील लोकांनी निवासस्थानासाठी आश्रय (सहारा) दिला. त्यामुळे हया जाती जमाती बऱ्याच प्रमाणात स्थायीक झालेल्या दिसतात. असे असले तरी त्या जाती-जमाती पूर्णपणे स्थायिक होऊ शकल्या नाहीत. आजही काही जाती-जमाती अस्थायी राहून आपले वितभर पोट भरण्यासाठी भटकंती करत आपला व्यवसाय करतात. भटक्या जाती- जमाती पूर्णपणे स्थायिक न झाल्यामूळे व त्यांची भाषा अलिखीत असल्यामूळे हया जाती-जमातीच्या संस्कृतिचा व लोकवाङ्मयाचा ,जिवनमान या विषयीचा चिकित्सक अभ्यास होऊ शकला नाही. परंतु आज काही प्रमाणात का होईना त्यांच्या जिवनमानाचा व लोकवाङ्मयाचा अभ्यास होत असल्याचे दिसते. भटक्यांच्या व्यथा, वेदना, कथा, संस्कृती, रुढी परंपरा, चालीरीती , व्यवसायकला , देवदेवता,जनजीवन, उत्सव, भाषा, पेहरावी-पोषाख, विधी-विवाह, जातपंचायती, लोककथा, लोकगीते, ओव्या, पौराणिकता, इ. विषयी प्रश्नाचे व समस्येचे स्वरूप आणि सद्य:परीस्थिती , भटक्या जाती-जमातींनी चालविलेले लढे या सर्व बाबींचे स्वरुप आधुनिक युगात वावरणाऱ्या जनतेच्या, अभ्यासक, संशोधक, शासन आणि सामाजीक कार्यकर्त्यांच्या लक्षात आणून दयावे. या उद्येशाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

आज हया जाती-जमातीत काही प्रमाणात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे तरूण वर्ग शिक्षण घेऊ लागला. विविध प्रकारच्या नौकऱ्या करू लागला. अनेक संघटनांच्या रुपाने हा तरूण वर्ग एकत्र येऊ लागला. फुले—शाहु-आंबेडकर चळवळीत सहभागी होऊन या चळचळीची धगधगती मशाल हाती घेऊन मिरवू लागला आहे.त्यामूळे त्यांचे लोकवाङ्मय आज लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे आंदोलनाशिवाय आत्मजाणीव निर्माण होत नाही. आणि आत्मजाणीवेशिवाय संघर्ष उभा राहु शकत नाही. हा महाराष्ट्रातील अंदोलनाचा इतिहास आहे.फुले,शाहु-आंबेडकर चळवळ ही आपल्या देशाला नवी दिशा देणारी धगधगती मशाल आहे. फुले-शाहु-आंबेडकरी विचारांनी हा भटका समाज भारावून गेला. त्यामुळे हया जमातीतील मोठा तरुण वर्ग नव्या चळवळी निर्माण (बांधु) करू लागला आहे. यातील महत्वपूर्ण बाब म्हणजे हा कार्यकर्ता वर्ग शिक्षित व सूजान आहे. ध्येयप्रणव आहे. वर्ग संघर्षासाठी त्यांचा पाया भक्कम असावा लागतो. पाया ठिसूळ असेल तर इमारत उभी राहु शकत नाही. त्याप्रमाणे चळवळीचा पाया भक्कम करण्यासाठी ज्ञान व विचार जागृती हे दोन महत्वाचे चिरे असावेच लागतात. या दोघांमधून आत्मजाणीव निर्माण होते. ही आत्मजानीव सर्व प्रकारच्या शोषणाच्या पंरपरा नाकारते आणि भविष्याकडे अर्थपूर्णपणे पाहते. अशा विविध चळवळी हा समाज करतो आहे.परंतु त्यांच्या चळवळींना म्हणावे तेवढे यश प्रप्त होत नाही. त्याचबरोबर हा समाज परीपूर्ण स्थायीक व शिक्षित नसल्यामुळे या भटक्या जाती-जमातीचा सर्वांगीन विकास होऊ शकला नाही.तेंव्हा सर्वसाधारणपणे आपणास प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून भटक्या विमुक्त जाती-जमातीचे जीवनमान, संस्कृती, देव-देवता, श्रध्दा-अंधश्रध्दा, पुजा-अर्चा, सण-वार, उत्सव,, विवाहविधी, त्यांच्या विविध जातपंचायती तसेच विविध घटकांविषयी महिती घेणे कर्मप्राप्त ठरते. त्याच बरोबर त्यांची लोकसंस्कृती,विधी, लोकगिते,भाषवैभव विविध प्रकारचे लोकवाङ्मय, लोककथा, म्हणी उखाणे, वाक्यप्रचार, पौराणिकतेचे स्वरुप जाणून घेणे महत्वाचे वाटते काही निवडक- घिसाडी,गोपाळ,गोंधळी,पांगुळ, वासुदेव, वडार,गोसावी,वैदु,पारधी,कोळी,या जाती-जमातीचा आणि त्यांच्या लोकङ्मयाचा अभ्यास करणे प्रस्तुत विषयाचे प्रयोजन आहे.

संशोधन विषय निवडीची भूमिका :

गरज ही शोधाची जननी आहे. मानवी मनासमोर विविध गरजा निर्माण होतात आणि या गरजांची पुर्ती करण्यासाठी संशोधक सारखा धडपडत असतो. पुढे अशा गरजामधुनच विविध समस्या, विधान, विषय उद्भवतात आणि संशोधक अशा समस्येचे निराकरण करण्यासाठी विविध प्रयत्न करीत असतो. अशीच संशोधकापुढील एक महत्वपुर्ण समस्या,विषय म्हणजे,'**नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांचे लोकवाङ्मय: एक चिकित्सक अभ्यास**' हा होय. या विषयाचे लोकसाहित्याच्या व शैक्षणिक दृष्टीकोणातून मुल्यमापन करणे महत्वपुर्ण वाटते. ज्या प्रमाणे आपल्या देशाची संस्कृती, देशाचा ऐतिहासिक वारसा जतन करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर भटक्या विमुक्त जाती जमातीचा वारसा, त्यांचे देश व समाज प्रेम, शैक्षणिक प्रगती कितपत झाली त्यांचे समाजातील स्थान काय? लक्ष्यात घेणे गरजेचे आहे.भटक्या विमुक्त जमातीचे अंतरंग त्यांच्या लोककथा, लोकगीते, लोककथागीते, म्हणी,उखाने इ. माध्यमातून कसे उलगडतात हेही पाहणे गरजेचे आहे.तसेच भटक्यांवर अन्याय अत्याचार होतो का? ते किती प्रमाणात शिक्षणापासून वंचित आहेत, जातीनिहाय व्यवसायातच कसे गुरफटत गेले आहेत हेही बघणे गरजेचे आहे.तसेच भटक्या जाती जमातीचा आजही भग्न संसार कसा आहे?. त्यांच्या अंर्तमनातील सुख-दुखे:, त्यांच्यावर नेहमी येणारी उपासमारीची पाळी , टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी आजही त्यांना गावोगाव भटकंती करून पुर्वजात व्यवसाय करावा लागतो. तसेच त्यांचे उच्चशिक्षणात आजही प्रमाण कमी आहे. या जमातीत बरेच लोक कमी शिकलेले असल्यामुळे ते व्यसनाधिन बनतात. तसेच या जामातीला आणखीही पाहिजे तशा शैक्षणिक आर्थिक सामाजीक सोयीसुविधा शासनाकडून मिळालेल्या नाहीत. असे आपणास दिसते. वरील विविध बाबी लक्षात घेण्यासाठी आणि भटक्या विमुक्तांच्या व्यथा, वेदना, दुखः पौराणिकता व त्यांचे अंतरंग समाजातील नागरीक, संशोधक मार्गदर्शक व शासन आणि सामाजीक कार्य करणाऱ्या संस्थांच्या लक्षात आणून देण्यासाठी सदरील विषयाची निवड केली आहे.

भटक्या विमुक्त जाती- जमातीच्या श्रमावर व त्यांच्या कलाकौशल्यावर आपल्या भारतातील खेडी, गावे व विविध देवदेवता उभारलेल्या आहेत. तसेच शेतीला लागणारी यंत्रसामुग्री विविध लेण्या, पवित्र स्थळे, शस्त्राशस्त्रे, लोकमनोरंजनातून उद्बोधन व हस्य रंजन यांनीच केले आहे. भटक्यांनी देशसेवेसाठी व समाजीक हितासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. तसेच आपला पारंपारीक व्यवसाय व कौशल्य जपून ठेवून त्यातच आपले हित आहे. असे विविधांगी कार्य करणारा हा समाज पाहिजे त्या प्रमाणात उच्चशिक्षणात दिसत नाही.भटक्या विमुक्त जमातीची शैक्षणिक प्रगती कितपत झाली आहे यांचाही शोध घेणे महत्वाचे आहे. भटक्या जाती-जमातीचे सामाजीक स्थान लक्षात घेणे महत्वाचे आहे.भटक्या विमुक्त बांधवांचे लोकगीते, लोककथा ,लोककथागीते ,पौराणिकता , सामाजीक अंतरंग इ. चा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्याच बरोबर आपल्या देशाची संस्कृती, ऐतिहासिक वारसा जतन करणे महत्वाचे आहे.भटक्या विमुक्तांची सामाजीक परिस्थिती त्यांचे दुखः, वेदना, अंतरंग प्रचलित समाजातिल लोकांसाठी, लेखकांसाठी, सामाजासाठी, शासनासाठी मार्गदर्शकासाठी व सामाजीक कार्य करणाऱ्या संस्थांच्या लक्षामध्ये आणुन देण्यासाठी. भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या लोकवाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास होणे महत्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

संशोधकाला कोणत्याही समस्येची किंवा विषयाची निश्चिती करताना त्यांनी विषय निवडीचे उद्दिष्टे सादर करणे कर्मप्राप्त ठरते. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी पुढिल उद्दिष्टे गृहित धरली आहेत.

१ भटक्या विमुक्त जाती जमातीच्या अंर्तमनाचा वेध घेऊन त्यांच्या लोकवाङमयाचे स्वरुप निश्चित करणे.

२ भटक्या विमुक्त बांधवांचे लोकगीते, लोककथा,लोककथागीते यांची समाजासाठी असलेली उपयुक्तता लक्षात घेणे.

३ भटक्या विमुक्त जाती जमातीची देशसेवा व समाजसेंवा कशी आहे याचा शोध घेणे.

४ भटक्या विमुक्त बांधवांच्या पौराणिकतेचा शोध घेणे.

५ भटक्या विमुक्तांच्या लोकवाङमयीन कार्य कर्तृत्वांचा शोध घेणे.

६ भटक्या विमुक्तांचे अंतरंग तत्कालिन सामाजासाठी, लेखकांना,शासनांना मार्गदर्शकांना व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या लक्षामध्ये आणून देणे.

७ भटक्या विमुक्त जाती जमातीचे सामाजिक, राजकिय,आर्थिक स्थान लक्षात घेणे .

८ भटक्या विमुक्त जाती जमाती आजही काही प्रमाणात गावकुसाबाहेर कसे जिवन जगतात याचा शोध घेणे.

९ ह्या जमाती नाईलाजाने आप-आपला पारंपारीक व्यवसाय कसा करतात याचाही शोध घेणे.

१० भटक्या विमुक्त जमातीची शैक्षणिक प्रगती कितपत झाली आहे याचा शोध घेणे.

११ ह्या भटक्या जमातीवर अन्याय व अत्याचार कितपत होतो का? याचा शोध घेणे.

१२ भटक्या विमुक्त भटक्या च्या कलाकौशल्याचा शोध घेणे.

१३ त्यांच्या लोकगीतातून, लोककथागीतातून सामाजिक संस्कृतीचे व समाज प्रबोधनाचे दर्शन कसे घडते यांचा शोध घेणे.

१४ भटक्या जाती जमातीतील सामाजिक सुधारणेची कळकळ व जाणीव असणाऱ्या अशा सुशिक्षित बांधवांमध्ये सामाजिक बांधीलकीची जाणीव निर्माण करून त्यांच्यात प्रेरणा व उत्साह जागृत करणे.

१५ भटक्या विमुक्त जमातीचे सण, वार,उत्सव, पेहरावी-पोशाख,बोलीभाषा इ. शोध घेणे.

१६ भटक्या विमुक्त जमातीच्या पूर्व इतिहासाचा आजच्या आधुनिक काळाशी असलेला परस्पर संबंध लक्षात घेणे.

१७ भटक्या विमुक्तांतधील घिसाडी, गोपाळ, गोंधळी, पंगुळ, वासुदेव,वडार, अशा जवळपास ६जाती जामाती व पोटजातीचा सखोल अभ्यास करणे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तूत संशोधन विषय हा नांदेड जिल्हयापुरताच संबंधित असून भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या जवळपास सहा जाती जमातींचा या संशोधनात अंर्तभाव आहे. प्रस्तूत संशोधनासाठी नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्त लोकवाङ्मयाच्या अभ्यासाअंतर्गत भटक्या विमुक्त जाती जमातितील जवळपास २० लोकांचा समावेश आहे. प्रस्तूत विषय हे मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयाअंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंध असून शै.वर्ष एप्रिल.२०१९ पासुन सादर करण्यापर्यंतचा कालावधी आहे. प्रस्तूत विषय संशोधन हे भटक्या विमुक्तांच्या लोकवाङ्मयामधून त्यांच्या वेदना दुखः सण-वार, उत्सव लोकपरंपरा, लोकसंस्कृती, लोकगीते, लोककथा, लोककथगीते,त्यांचे सामाजिक स्थान, व त्यांना येणाऱ्या विविध समस्या व त्यांचे लोकवाङ्मयीन कर्तृत्व याचा शोध घेण्यासंबंधी संशोधन कार्याची व्याप्ती मर्यादित आहे. प्रस्तूत विषयाचे संशोधन हे नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्त जाती जमातीमधील घिसाडी, गोपाळ, गोंधळी, पंगुळ वासुदेव,वडार अशा जवळपास ६ जाती जामाती व त्यांच्या लोकवाङमयावर अवलंबुन आहे.

संशोधनाच्या अभ्यासपध्दती :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन हे प्रामुख्याने भटक्या विमुक्त जाती जमातीच्या लोकवाङ्मयावर असून योग्य संशोधनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन करण्यासाठी प्रमुख्याने पुढील अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.ऐतिहासिक, तुलनात्मक, समाजीक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल भटक्या विमुक्तांच्या वाङ्मयाच्या उपलब्ध दुर्मिळ साहित्य कलाकृतीच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. भटक्या विमुक्त जाती-जमातीमधील विविध लोकांना भेटी देऊन व हया जाती जमातीतील विविध लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन तिथे मिळालेल्या माहितीचा अन्वयार्थ लावून संशोधनपध्दती शास्त्रातील शिस्तीप्रमाणे या साहित्याची मांडणी केली आहे. प्रश्नावली तयार करून नांदेड जिल्हातील भटक्या विमुक्त जाती जमातीमधील अनुयायांना भेटी देऊन त्यांच्या मुलाखती घेण्यात येतील. त्यांना दिलेल्या मिळालेल्या माहितीचा अन्वयार्थ

लावून हे संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. प्रश्नावली तयार करून भटक्या विमुक्त जाती– जामातीमधील विविध लोकवाङ्मयीन कार्याचे समाजीक व सास्कृतीक,शैक्षणीक जीवनमानतील इ. बाबीचे मूल्यमापन केले जाईल.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासाचा आराखडा पुढील प्रमाणे आहे

प्रकरण : पहिले

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांची सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती

मराठवाडयातील नांदेड जिल्हा हया परीसरात विविध तालुके व नैसर्गिक वातावरणाबरोबर विविध जाती धर्मांनी व परंपरेंनी नटलेला असून या परीसरात इतर जाती जमातीबरोबरच अनेक भटक्या विमुक्त जाती जमाती राहतात.परंतु त्यापैकी गोसावी, घिसाडी, गोपाळ, गोंधळी, पांगुळ, वासुदेव,वडार अशा सहा जातीच्या सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करावयाचा आहे. या सर्वच जाती जमातीचा आपापला व्यवसाय करण्यासाठी गावोगाव भटकंती करून भिक्षा मागणे व मिळालेल्या दानातून आपल्या संसाराचा गाडा चालविणे हा त्यांचा जिवनक्रम बनलेला आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयाची भौगोलिक स्थिती व भाषिक परीसर यांचा आढावा घेण्यात येईल.तसेच नांदेड जिल्हयातील एकूण लोकसंख्या,स्त्री-पुरूष प्रमाण, तसेच भटक्या विमुक्त जाती जमातीचा पुर्व इतिहास, भटक्या विमुक्त जाती जमातीची निर्मिती, भटक्या विमुक्त जाती-जमातीचे स्वरूप व व्याख्या, विशेष, याचीही प्रकर्षाने सखोल मांडणी करण्यात येईल. तसेच भटक्या विमुक्त जाती-जमातीची सामाजिक,सांस्कतिक स्थिती, व देशाविषयी असलेले योगदान या घटकांचाही सखोल अभ्यास करण्यात येईल.अशाप्रकारे वरील विविध मुख्य घटक व उपघटकावर लक्ष केंद्रित करून भटकयांच्या व्यथा,वेदना, सुख-दु:ख, आंतरीक कौशल्य, भषिक कौशल्य,त्यांचे सामाजिक जीवनमान अशा विविध घटकांवर प्रकाश टाकून त्यांचा सखोलपणे शोध घेऊन संशोधनात्मकरित्या अभ्यास वरील प्रकरणामध्ये करण्यात येईल

प्रकरण : दुसरे

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांचे लोकवाङ्मय : प्रेरणा आणि स्वरुप

भटक्या विमुक्त जाती-जमाती हया गावशिवाबाहेर भटकंती करत जीवन जगत असतात. नागरी जीवनापासुन,सामाजिक हक्कापासुन व घटनाकात्मक सोयीसोविधांपासुन कोसो दुर राहुन उपेक्षितच जीवन जगत आलेल्या आहेत. भटक्या जाती-जमातीच्या व्यथा, व्यदना , कथा, संस्कृती, रूढी-परंपरा, व्यवसायकला, देवदेवता, जातपंचायती, लोककथा, लोकगीते, भाषा वैभव, पेहराव पोषाख, पौराणिकता,इ. विषयी प्रश्नाचे व समस्यांचे स्वरू जाणून घेणे आणि त्यांच्या लोकवाङ्निर्मीतीच्या प्रेरणा स्पष्ट करणे. सामाजिक सुधारणेची कळवळ व जाणीव असलेल्या सुशिक्षित बांधवात सामाजिक बांधलिकीची जाणीव निर्माण करूण त्यांचा उत्साह जागृत करणे हा या शोध प्रबंधाचा दृष्टिकोण आहे.तसेच भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या अंतरमनाचा शोध घेऊन त्यामधील काही निवडक भटक्या जमातीच्या पुर्वइतिहास , त्यांच्या चालिरीती, रितीरिवाज जाणून त्यांच्या लोकवाङमयाच्या नेमक्या प्रेरणा कोणत्या आहेत ? त्याचे स्वरूप काय आहे ? याची मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये करावयाची आहे.

प्रकरण : तिसरे

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांचे लोककथावाङ्मय :

मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित असलेल्या कथा म्हणजे लोककथा. लोककथांना प्राचीन काळापासून लोक-वाङ्मयात महत्वपूर्ण स्थान आहे. लोकजीवनात लोककथांना महत्वपूर्ण स्थान असल्यामूळे लोककथा विपूल प्रमाणात आढळतात. लोककथा हे मनोरंजनाचे साधन असल्यामूळे लोकजीवनात कथा सागण्याची प्रथा रुढ झाली. काही जमातीत तर लोककथांचा संबंध एखादया विधीशी जोडलेला असतो. विधी आणि लोककथा यांचा परस्पर संबंध फार प्राचीन काळापासुन चालत आलेला आहे. लोकमनावर लोककथांचा विलक्षण परिणाम झाला आहे. भारतात लोककथांची परंपरा व भटक्या विमुक्तांचे लोककथा वाङ्मय फार प्राचीन असल्याचे दिसते. या प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयाअंतर्गत असणाऱ्या विविध तालुक्यात वावरणाऱ्या भटक्या विमुक्त जमातींच्या लोकवाङ्मयीन लोककथावर सखोल प्रकाश टाकून व्यवस्थित मांडणी करण्यात येईल. भटक्या विमुक्तांच्या लोकवाङ्मयाचा व लोककथांचा चिकित्सक अभ्यास व मांडणी या प्रकरणामधे करण्यात येईल.लोककथावाङ्मयाची पूर्वपरंपरा, स्वरूप व वैशिष्टय व लोककथांचा सखोलपणे अभ्यास व मांडणी करण्यात येईल.

प्रकरण : चौथे

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांची लोकगीते

लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. लोकं एकत्र येवून समुहाने राहु लागले तेंव्हापासुन लोकगीतांची परंपरा सुरू झालेली दिसते. म्हणजेच माणवाच्या अदिम व्यवस्थेत मानव टोळया करून राहु लागला तेंव्हापासुन लोकगीतांचा प्रवाह अखंडपणे वाहत आलेला असावा असे वाटते.वेदपुर्वकाळात, वेदकाळात, पुराणे, ब्रम्हणग्रंथ, बौध्द आणि जैन वाङ्मयात लोकगीतांचा अल्लेख आढळतो.वेदकाळात विविध लोकगीते प्रचलित होती. यज्ञविधी प्रसंगी गाणी म्हणणे पुत्र जन्म, विवाह इ. प्रसंगी वेदकाळात गाणी गायली जात असत.वेदकाळापासून लोकगीताची परंपरा प्रचलीत असली तरी प्रचीन मराठीतील संतवाङ्मय रचनेत महानुभाव वाङ्मयामध्ये देखील लोकपरंपरेचे उल्लेख आढळतात.लोकगीतांत लोकसंस्कृतीची परंपरा त्यांचे जीवन,संसार आदिदेवतावरील विश्वास या गोष्टी असतात. परंतु प्रत्येक ठिकाणच्या लोकपरंपरेत स्थळ काळ त्यांची भौगोलिक परीस्थिती वेगवेगळी असते. त्यांच्या चालिरीती पोशाख, नृत्य इ.मध्ये वेगवेगळेपणा जाणवतो. लोकगीते हे सामुहिक असतात.त्यामळे गिते गाणारे व ऐकणारे या दोघांनाही आनंद मिळतो.अशाप्रकारे लोकगितोची ही मौखिक परंपरा पूर्वीपासुन एका पिढी कडुन दुसऱ्या पिढीकडे चालत गेलेली आहे.त्यामुळे ती परंपरा आजही टिकून असल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांची लोकगीते याचा सखोल अभ्यास करण्यात येईल. त्याच बरोबर भटक्या विमुक्त पुरूषाची गीते, भटक्या विमुक्त स्त्रीयांची गीते व बालगीते किंवा बडबडगीते, ओवीगीते अशा सर्व घटकांचा सखोल अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

प्रकरण :पाचवे

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांच्या म्हणी, ऊखाने, वाक्प्रचार आणि पौराणिकतेचे स्वरूप

प्रस्तुत प्रकरणामध्ये भटक्या विमुक्तांच्या लोकवाङ्मयाचा पौराणिक दृष्टिकोणतूनअभ्यास करण्यात येईल.त्यांची पौराणिकता समजून घेण्यासाठी म्हणी उखाने वाक्प्रचार यांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. हा समाज पुर्णपणे स्थायिक नसल्यामूळे व शैक्षणिक सवलतीपासून वंचीत असल्यामूळे या जमातीचा फारसा शैक्षणिक व इतर क्षेत्रातील विकास होऊ शकला नाही. त्यांच्या माथी आपला पारंपारीक व्यवसाय असल्यामूळे ते आपला व्यवसाय सोडण्यास तयार

नसतात.ते आपला व्यवसाय प्रिय माणून त्यावरच आपला प्रपंच चालवितांना दिसतात. दिवसभर भटकंती करून सायंकाळी आपल्या पालावर किंवा निवासस्थानाकडे आल्यावर आपला शाररीक व मानसिक थकवा घालवण्यासाठी मनाला विरंगुळा मिळण्यासाठी तें लोकं गाणे, गीते, लोकोक्तीचा वापर करतात. त्यांच्या लोकवाङ्मयीन कृतीतून अनेक म्हणी, उखाने , वाक्प्रचार इ. घटकाबरोबरच पौराणिकतेची दर्शन होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये भटक्या विमुक्तांच्या लोकवाङ्मयीन पौराणिकतेचे स्वरूप समजून घ्यावयाचे आहे. त्यांच्या पोटजाती, पवित्र स्थान(पवित्र मठ), लग्नविधीसंस्कार, रूढीप्रथा, परंपरा, अंत्यविधी, मोक्षप्राप्ती लोककथागीते, अद्भूतकथा, नितीकथा, वीरकथा, हास्यकथा,व्रतवैकल्याच्या कथा अशा विविध पौरांणिक घटकांचा चिकित्सक अभ्यास सदरील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण :सहावे

नांदेड जिल्हयातील भटक्या विमुक्तांची लोकवाङ्मयीन बोलीभाषा

मराठवाडयातील नांदेड जिल्हयातील विविध तालुक्यामध्ये भटक्या जाती जमाती हया आपले वितभर पोट भरण्यासाठी आपापला पारंपारीक व्यवसाय करण्यासाठी गावोगावी भटकंती करीत असतात.हया जमाती व्यवसायामध्ये विविध प्रांतात विखुरलेल्या असल्यामूळे त्या त्या प्रांतांचा प्रभाव त्यांच्या बोलीवर पडत गेला. त्यामूळे बोली संमिश्र स्वरूपाच्या बनल्या गेल्या. कालातंराने भटक्या जमाती काही प्रमाणात स्थायिक होऊ लागल्या त्यांच्या बोली काहि प्रमाणात अवगत होऊ लागल्या.भटक्या जमाती हया मुळातच गावाबाहेर/जंगलात टोळी टोळीने राहत असल्यामूळे त्यांना आपला दैनंदिन व्यवहार चालविण्यासाठी भाषेची गरज भासली. त्यातूनच सर्वांच्या वेगवेगळया बोलीभाषेचा विकास होत गेला. तसेच त्यांच्यात व्यावसायिक भिन्नता असल्यामूळे प्रत्येक जमातीची बोली वेगळी बनत गेली. तेव्हापासूनच बोली अस्तिवात आल्या असे म्हणता येईल.भटक्या जमाती आपला व्यवसाय करतांना इतर समाजगटांना समजेल अशा भाषेत बोलतात. परंतु दैनंदिन व्यवहारात बोलतांना आपली एक वेगळी बोली बोलतांना दिसतात. म्हणूनच त्यांची व्यावसायीक बोली व दैनंदिन बोली यामध्ये देखील आपनास भिन्नता जाणवते. तसेच त्यांची बोली फारशी लिखित नसल्यामुळे चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करणे कठिण होऊन बसले आहे.तरीही त्यांच्या बोलिचे काही नमुने लक्षात घेऊन त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये भटक्या विमुक्तांच्या बोलीभाषेचा इतिहास, बोलीभाषेची निर्मिती व उगम, त्यांच्या बोलीवरील प्रभाव,त्यांच्या बोलीभाषेची नमुने गोळा करून व त्यावर संशोधन करून प्रकर्षाने मांडणी करण्यात येईल.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोधन विषयामध्ये वरील सहा प्रकरणाचा समावेश असेल. तसेच या सर्व प्रकरणाचा किंवा अनुक्रम घटनेचा सविस्तररित्या अभ्यास करून, विविध भ्टक्या जाती- जमातीमधील लोकांच्या मुलाखती घेऊन,भाषिक नमुने गोळा करून, लोकगीते,लोककथा, लोककथागीते सामाजीक स्थिती, त्यांचा पुर्वइतिहास इ. बाबीची सविस्तर माहिती सखोलपणाने लिहीली जाईल. असा एक उत्कृष्ट आराखडा तयार होण्यासाठी वरील सर्व घटक महत्वाचे आहेत.

प्रकरण : सातवे

निष्कर्ष आणि निरीक्षणे

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासातुन निघणारे निष्कर्ष या प्रकरणामध्ये मांडले जातील.नांदेड जिल्हयामधील विविध तालुक्यात विभिन्न भटक्या जाती जमाती आपली उपजिविका पुर्ण करण्यासाठी आजही व्यवसाय करतात. त्यामूळे त्यांची व्यवसायिक बोली व सामाजिक बोली यांचाही तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष मांडण्यात येतील.भटक्या

विमुक्तांच्या लोकवाङ्मयाचा, बोलीभाषेचा व सामाजिक स्थान, राजकीय स्थान, अर्थिक स्थान, समाजगीते इ. घटकांच्या अभ्यासाअंती जे निष्कर्ष निघतील त्यांची चिकित्सक मांडणी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

संदर्भसूची

१ भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती - डॉ. लीनकुमार बावने.
२ अस्पृश्य मुळचे कोण? आणि ते अस्पृश्य कसे बनले. - डॉ. बी.आर. आंबेडकर.
३ लोकसाहित्याचे स्वरूप - डॉ. प्रभाकर मांडे.
४ लोकसाहित्य आणि स्वरूप : संकल्पना - डॉ. शरद व्यवहारे.
५ महाराष्ट्रातील लोकनृत्य -डॉ. सदानंद राणे.
६ श्री मल्हारी महात्म्य-कथासार - श्री अ. वा. गोडबोले.
७ भारतीय अदीवासी समाज - ए. वाय. कोंडेकर –
८ मनुस्मृती मनु-अध्याय (८,१०,५१,५२,५३,)
९ सण, सोहळे, स्त्रीगीते - - अशा परूळेकर.
१० लोकसाहित्याची रुपरेखा - दुर्गा भागवत.
११ मराठी भाषेचे वाक्प्रचार व म्हणी- वि.वा.भिडे.
१२ मराठी कथा उद्गम आणि विकास - इंदुमती शेवडे.
१३ लोकसाहित्य संशोधन पध्दती - अनिल सहस्त्र बुध्दे.
१४ लोकसाहित्य शोध आणि समीक्षा - रा.चिं. ढेरे .
१५ लोकसाहित्य लोकसंस्कृती - विद्या व्यवहारे –
१६ मराठी लोकसंस्कृतीचे उपासक - रा.चिं.ढेरे.
१७ मराठीतील स्त्रीधन - डॉ.सरोजिनी बाबर.
१८ लोकगीतोंकी सांस्कृतिक पृष्ठभूमी - डॉ.विद्या चव्हाण.
१९ महाराष्ट्र का लोकधर्मी नाट्य - डॉ.दुर्गा दिक्षीत.
२० हमारे संस्कार गीत राजरानी वर्मा.
२१ भटक्या विमुक्तांचे अंतरंग - लेखक :- चव्हाण राणा
२२ अंधारवाटा संपादक :- □श्रीकांत मुद्दे (प्रर्वतन पब्लीकेशन)
२३ मराठीतील भटक्या जमातीच्या आत्मकथनातील लोकजीवनाचा चिकीत्सक अभ्यास - डॉ. संजय हापगुडे
२४ विमुक्तायन - लक्ष्मण माने १९९७ य.च.प्रतिष्ठाण प्रथम आवृत्ती १९९७
२५ भटक्या विमुक्तांची आत्मकथने : संकल्पना आणि स्वरूप - डॉ. अंकुशकुमार चव्हाण २००९
२६ जातीव्यवस्था व स्त्रीमुक्ती- प्रतिमा परदेशी,सरोज कांबळे २००९
२७ भटक्यांचे लग्न - उत्तम कांबळे : मनोविकास प्रकाशन ,सुधारीत आवृत्ती २००८पृ१३
२८ कोल्हयाचे पोर - कोशोर शांताबाई काळे, ग्रथाली प्रणाली , पुनर्मुद्रण २००९
२९ विमुक्त भटक्या आणि निम भटक्या जमातीसाठीचा राष्ट्रीय आयोग अहवाल -३० जून २००८, भाष्य लक्ष्मन माने

३० अदिवासी समाजाचे समाजशास्त्र -डॉ. घायाल एस.पी. , अरूणा प्रकाशन
३१ भटक्या विमुक्तांचे साहित्य : एक आकलन -मारोती कोल्हे, अनुराधा पब्लिकेशन
३२ लोकसाहित्याचे सामाजिक आकलन - डॉ. धोंडगे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर
३३ लोकगितोंकी सांस्कृतीक पृष्ठभुमी - डॉ. विद्या चौहान
३४ महाराष्ट्रातील भिल्ल संस्कृतिचा अभ्यास - डॉ. जिजा सोनवणे
३५ लोकरंगभुमी - डॉ. प्रभाकर मांडे
३६ लोकसाहित्याची भाषा आणि लोकसाहित्याची शब्दसंपदा - डॉ. कृ. पां. कुलकर्णी महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती
३७ लोकरसाहित्य एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र - डॉ. गंगाधर मोरजे रा. धो. दास्ताने चित्रशाळा चौक, पुणे.
३८ सर्वेक्षण नोंदवही
३९ सीमी प्रदेशातील भावगंगा - डॉ. तारा परांजपे, प्रकाशन द.प. जोशी हेद्राबाद
४० धर्म अणि लोकसाहित्य - डॉ. दुर्गा भागवत , पॉप्युलर प्रकाशन
४१ लोककथा - डॉ. सरोजनी बाबर
४२ फोक लिटरेचर ऑफ महाराष्ट्र - डॉ. सरोजनी बाबर
४३ गाववाडयाबाहेर - प्रभाकर मांडे
४४ लोकनांगरभुमी - डॉ. तारा भवाळकर
४५ मराठी लोकगिते : स्वरूप विशेष - डॉ. शरद व्यवहारे
४६ लोकसाहित्यांचे लेणे - मालतीबाई देशपांडे

-: संशोधक :-

श्री. कांबळे पंडित महादू
मराठी विभाग प्रमुख,
भारती कला व विज्ञान महाविद्यालय,
हदगांव.
ता. हदगाव जि. नांदेड.

-: मार्गदर्शक :-

प्रा. डॉ.संतोष चंपती हंकारे
मराठी विभाग प्रमुख
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगांव.ता. गंगाखेड जि. नांदेड.